# संचार



सोलापूर, रविवार दि. २५ नोव्हेंबर २००७



रविवार, दि. २५-११-२००७ पान २ संचार, सोलापूर


# नामस्मरणाने संकटांना टाळता येते : पाताडे

**सोलापूर, दि. २४ (प्रतिनिधी)- नामस्मरण आणि शुध्द आचरणाने जीवनात उद्‌भवणाऱ्या संकटांना टाळता येऊ शकते, असे प्रतिपादन ज्योतिषशास्त्री श्रीराज पाताडे यांनी केले.**

कृष्णमूर्ती ज्योतिष अभ्यास मंडळाच्या चौथ्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी दुपारच्या सत्रात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष सुरेश शहासने, ज्योतिषतज्ञ तुषार सावडावकर, विनायक आगाटे आदी उपस्थित होते.

'गुन्हेगारी व जेलयोग' या विषयावर जन्मकुंडलीच्या प्रात्यक्षिकाद्वारे पाताडे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, नामस्मरणामुळे मनुष्यामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे वाईट कृत्य त्याच्या हातून होत नाहीत. कुंडलीतील मंगळ व अष्टम स्थानातील दशेमुळे तुरुंगवास संभवतो. जीवनातील संकटे टाळण्यासाठी स्तोत्र वाचन व चांगले आचरण आवश्यक आहे.

यावेळी तुषार सावडावकर म्हणाले की, ज्योतिष शास्त्रात सर्व विषयांचा अंतरभाव होतो. गुन्हेगारी तसेच आपले जीवनमान याविषयी जाणून घेण्यासाठी प्रत्येकाला उत्सुकता असते. दीर्घायुष्य, अल्पायुष्य, मध्यम आयुष्य हे कुंडलीतील ग्रहाच्या दशेवरून सांगता येतात. कायदा व कर्म या गोष्टींना चकवा देता येत नाही. कर्मानुसारच मनुष्याला जीवनात फळ मिळते, असेही ते म्हणाले.

प्रारंभी अधिवेशनाच्या सकाळच्या सत्रात गोविंद हेंद्रे यांनी 'शेतीमालाच्या भावाचा अंदाज' या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. प्रश्न, कुंडली व ग्रहमान यांच्याबरोबर अँग्रीकल्चर या विषयाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दुपारच्या सत्रात 'घर, जागा, जमीन, वाहन' या विषयावर विजय जोशी (पुणे), लक्ष्मण ठाकूर (मुंबई) व हेमा मराठे यांनी मार्गदर्शन केले. 'विहिरीचे पाणी' या विषयावर संजय प्रभू यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतरच्या सत्रात श्रीराज पाताडे यांनी 'परदेशगमन' या विषयावर मार्गदर्शन केले.

अब्दुलपूरकर मंगल कार्यालय, सात रस्ता येथे आयोजित तीन दिवसीय कृष्णमूर्ती ज्योतिष अधिवेशात कृष्णमूर्ती ज्योतिष पध्दतीच्या विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात येत आहे. या अधिवेशनात महाराष्ट्र व गोवा राज्यातील ३०० ज्योतिष अभ्यासक सहभागी झाले आहेत.

अधिवेशनस्थळी ज्योतिष विषयाच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आलेले आहे. तसेच रुद्राक्ष ग्रहानुसार खडे आदी स्टॉल ठेवण्यात आलेले आहेत. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी कृष्णमूर्ती मंडळाचे अध्यक्ष सुरेश शहासने, कार्याध्यक्ष राजेश पुजारी, उपाध्यक्ष मोहन दाते व कार्यवाह तुषार कुलकर्णी आदी परिश्रम घेत आहेत. रविवार दि. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता निरुपणकार विवेक घळसासी यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशनाचा समारोप होणार आहे.